दै. गोदातीर दि. 05.02.2025

# पोलिसांच्या कोबिंग ऑपरेशनमध्ये अट्टल गुन्हेगार जाळ्यात; नाकाबंदीत अनेकांची तपासणी



नांदेड (प्रतिनिधी) – शहर व जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था होणार नाही यासाठी पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी कोबिंग ऑपरेशन करून जवळपास दीडशे कर्मचाऱ्यांमार्फत वेगवेगळ्या ठिकाणी नाकाबंदी लावून आरोपींची कसून चौकशी केली. यावेळी मोटार वाहन कायदा अंतर्गत ११ वाहनावर दंडात्मक कारवाई करून पाहिजे आणि फरारी आरोपींना अटक केली आहे.

शांततेला बाधा पोहोचविणाऱ्या संमाजकंटकांवर पोलिसांची सतत करडी नजर आहे. पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी सराईत गुन्हेगारांना हद्दपार तर काहींना हर्सुल कारागृहात स्थानबद्ध केले आहे. तरीही काही झोपडपट्टी दादा गल्लीबोळात जाऊन दहशत पसरतात. शांततेला बाधा पोहोचण्याचे काम करत असल्याने सोमवारी रात्री कोबिंग ऑपरेशन राबविण्यात आले. यासाठी २४ पोलीस अधिकारी आणि १२८ कर्मचारी वेगवेगळ्या ठिकाणी नाकाबंदी लावून गुन्हेगारांना सळो की पळो करून सोडले. ज्यात जबरी चोरी, चोरी, घरफोडी आधी प्रकरणात ६४ गुन्हेगारांची तपासणी केली. तर पाच जण पाहिजे आणि फरारी असलेल्यांना अटक केली. त्यासोबतच बेलेबल वॉरंट १५ जणांना तामिल केले तर नॉन बेलेबल वॉरंट आठ जणांना तामील केले.

मुंबई पोलीस १२२ प्रमाणे दोन जणांवर कारवाई करून तिघांना अटक केली. तसेच वाळू माफियांवर एका ठिकाणी कारवाई करून १५ तडीपार आरोपींचीही तपासणी केली. यासाठी पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार, अतिरिक्त पोलीस अधीक्षक सुरज गुरव, उपविभागीय पोलीस अधिकारी सुशीलकुमार नायक, सहाय्यक पोलीस अधीक्षक कीर्तीका सी. एम., पोलीस स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक उदय खंडेराय यांच्या मार्गदर्शनाखाली नांदेड शहरातील सर्व पोलीस स्टेशनच्या ठाणेदार व कर्मचारी यांनी तसेच देगलूर, धर्माबाद उपविभाग, अर्धापूर या ठिकाणी नाकाबंदी करण्यात आली.

# कोम्बींग ऑपरेशनमध्ये गुन्हेगारांची तपासणी

**प्रतिनिधी ● नांदेड**

देगलूर, बिलोली आणि नांदेड शहरात काही ठिकाणी पोलीसांनी कोम्बींग ऑपरेशन राबवून गुन्हेगारांची तपासणी केल्यानंतर वाहनधारकांवर कारवाई करून सुमारे १९ हजाराची दंडात्मक कारवाई केली.

गंभीर गुन्ह्यांना आळा घालण्यासाठी देगलूर, बिलोली, नांदेड ग्रामीण आदी ठिकाणी वेगवेगळ्या चौकात रात्रीच्या वेळी कोम्बींग ऑपरेशन राबविण्यात आले. यामध्ये स्वतः अबिनाश कुमार यांनी भाग घेऊन विविध चौकात जाऊन पाहणी केली. जवळपास २४ अधिकारी आणि १२६ अमलदार, ऑपरेशनसाठी लावण्यात आले होते. यावेळी दरोडा, चोरी, घरफोडी करणारे ६४ गुन्हेगारांच्या हालचाली तपासण्यात आल्या तर वेगवेगळ्या गुन्ह्यात असलेले परंतु, फरार झालेले पाच आरोपींना पोलिसांनी अटक केली. याशिवाय बेलेबल व नॉनबेलेबल वॉरंट असलेल्या २३ जणांना चेक केले. तसेच तिघा जणांकडे शस्त्र सापडल्याने त्यांच्यावर कारवाई करण्यात आली. दरम्यान तडीपार असलेल्या १५ गुन्हेगारांची तपासणी करण्यात आली. कोम्बींग ऑपरेशन दरम्यान बेकायदेशीररित्या रेती चोरी करणाऱ्या विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला.

एकूण ११ वाहनधारकांवर कारवाई करून १९ हजार रुपयांची दंडात्मक कारवाई करण्यात आली. पोलीस अधिक्षक अबिनाश कुमार यांच्या मार्गदर्शनाखाली अपोअ सुरज गुरव, डिवायएसपी डॅनियल बेन, संकेत गोसावी यांच्यासह विविध पोलीस ठाण्यातील अधिकाऱ्यांनी सहभाग घेतला होता.